# नवीन अभ्यासक्रमावर आज कार्यशाळा

**देगलूर / प्रतिनिधी**

स्वामी रामनंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शैक्षणिक वर्ष २०२४- २५ पासून सर्व पदवी स्तरावरील अभ्यासक्रमासाठी नवीन अभ्यासक्रम लागू केला आहे. प्रस्तुत नवीन अभ्यासक्रमावर अध्यापन करणारे प्राध्यापक व अभ्यास मंडळ अध्यक्ष व सदस्य यांच्यात सुसंवाद व विचारमंथन होणे आवश्यक आहे. त्यासाठी स्वा. रा.ती.म.विद्यापीठ नांदेड व अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील अर्थशास्त्र व शारीरिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ०७ ऑगस्ट बुधवार रोजी बी. ए प्रथम वर्ष अर्थशास्त्र व शारीरिक शिक्षण विषयाच्या नवीन अभ्यासक्रमावर विद्यापीठस्तरीय कार्यशाळा आयोजीत करण्यात आली आहे. प्रस्तुत कार्यशाळेत नांदेड ,लातूर,परभणी व हिंगोली जिल्ह्यातील दोन विषयाचे सर्व प्राध्याप .. ५ बोर्ड ऑफ स्टडीचे अध्यक्ष व सदस्य सहभागी होणार आहेत .

कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमच्या अध्यक्षस्थानी अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पा.बेम्बरेकर राहणार असून उद्घाटक म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्रमुख पाहूणे अधिष्ठाता डॉ.सी.आर. बावीस्कर अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. लक्ष्मण पाटील, शारीरिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ नागनाथ गजमल उपस्थित राहणार आहेत. प्रस्तुत कार्यशाळेत जास्तित जास्त प्राध्यापकांनी सहभागी व्हावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन ख़ताळ , उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार , कार्यशाळा समन्वयक अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. अशोक टिपरसे व शारीरिक शिक्षणविभागप्रमुख प्रा. दीपक वावधाने यांनी केले आहे.

Scanned with OKEN Scanner